# इचलकरंजी महानगरपालिका,इचलकरंजी
## मालमत्ता व्यवस्थापन विभाग
## जाहिर प्रकटन

इचलकरंजी महानगरपालिका मालमत्ता व्यवस्थापन विभागाकडून थोरात चौक शॉपिंग सेंटर मागील मोकळी जागा पे & पार्ककरीता ठेकापध्दतीने देणे (दोन वर्षाकरीता) किमान वार्षिक प्रिमियम (आधारभूत किंमत) **२,१६,०००/-** ( GST वगळून) कामाची जास्तीत जास्त रक्कमेवर अटी/ शर्तीच्या अधिन राहून नोंदणीकृत व्यक्ती/ संस्थांकडून दर मागविणेत येत आहे.

वरील कामी दुहेरी लिफाफा पध्दतीचा अवलंब करणेत येत आहे.

**अ) लिफाफा क्रं.१ मध्ये खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.**

१) बयाणा रक्कम रु. ४४००/- इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील राष्ट्रीयकृत /शेडयूल्ड/सार्वजनिक क्षेत्रातील बँकेच्या शाखेतील कामाची मुदत अधिक ६ महिने इतक्या कालावधीचा धनाकर्ष (डी.डी.) मा.आयुक्त, इचलकरंजी महानगरपालिका यांचे नावाने काढणेचा आहे.

२) व्यक्ती / संस्था नोंदणी प्रमाणपत्र या पैकी एक.

३) निविदाधारक यांचे पॅन कार्ड याची सत्य प्रत.

४) नविन जी.एस.टी.कर प्रणालीनुसार निविदा भरणेची आहे. जी.एस.टी. रजिस्ट्रेशन आवश्यक आहे. ( आवश्यक असलेस)

५) भारतात/राज्यात कोणत्याही शासकीय/निमशासकीय विभागाकडून काळा यादीत टाकले नसलेबाबतचे स्वयंघोषणा पत्र.

६) पदाधिकारी सहभाग नसलेबाबतचे प्रतिज्ञापत्र

७) निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असलेबाबतचे (फॉर्म १B १०० रु. च्या स्टँप पेपरवर जोडणेचे आहे)

**ब) लिफाफा क्रं.२ मध्ये खालील कागदपत्रे जोडावेत.**

१) अक्षरी व अंकी नमूद केलेले दरपत्रक निविदाकारांने साक्षांकीत केलेले असावे.

. . . २

Scanned with CamScanner

## अटी व शर्ती

१) या कामगिरीकरितां किमान वार्षिक प्रिमियम रु.2,29,392 +१८% G.S.T. असा निश्चित करणेत आलेला आहे. रु. 2,29,392 +१८% G.S.T. पेक्षा कमी प्रिमियम ऑफरने सादर केलेल्या ठेकाचा विचार केला जाणार नाही.

२) वाहन पार्किंगसाठी खालीलप्रमाणे दर राहतील:

| अ.क्र | वाहन प्रकार | दर रु. (प्रति 12 तास) | 12 तासानंतर प्रति 1 तसा करिता |
|---|---|---|---|
| ३ | ट्रक्स/लक्झरी प्रवासी बसेस व इतर अवजड वाहने | रु. ५०.०० (१८% GST सह) | रु. १०.०० (१८% GST सह) |

३) निविदा मंजुरीचे पत्र (ठेका स्वीकृती पत्र) दिलेपासून १० दिवसांच्या आत नियमानुसार आवश्यक रक्कमेच्या स्टँप पेपरवर रितसर करार करुन देणेचा आहे

४) मंजूर ठेकादारांची सुरक्षा ठेव दोन वर्षांची करारची मुदत संपलेनंतर दोन महिन्यांत रितसर येणे वजा करुन परत केली जाईल, सुरक्षा ठेव रक्कम परत करतांना त्यावर व्याज दिले जाणार नाही.

५) ठेका स्वीकृतीपत्र मिळालेपासून मंजूर ठेकेदार यांनी मुदतीत सुरक्षा ठेवीची पुर्तता न केलेस, अगर ठेका स्वीकारणेस असमर्थता दर्शविलेस ठेका बयाणा रक्कम जप्त करुन खास जमा करुन घेणेत येईल व ती परत अदा केली जाणार नाही. व संबंधीत ठेकादाराची निविदा नामंजूर करण्यात येईल

६) ठेकादाराकडून देणेत आलेल्या प्रिमियम रकमेवर सध्याच्या दरानुसार १८% दराने जीएसटी देय राहील. कोणत्याही परिस्थितीत/कारणास्तव अगर एनवेळी नवीन कर लागू झालेचे कारणास्तव अगर प्रचलित कराचे दरामध्ये बदल झालेचे कारणास्तव दिलेल्या प्रिमियम ऑफरचे दरामध्ये बदल करता येणार नाही. कोणत्याही करासंबंधीची जबाबदारी इचलकरंजी महानगरपालिकेची रहाणार नाही.

७) मंजूर ठेकेदार यांना कोणत्याही सबबीस्तव इतर पार्टीजना कंत्राटाचे काम परस्पर तबदील करणेचा अधिकार असणार नाही व ठेकामधील कोणत्याही कामासाठी मा.आयुक्त यांचे पूर्वपरवानगीशिवाय पोट कंत्राटदार नेमता येणार नाही.

८) ठेका मुदतीत कोणत्याही कारणास्तव वाहनधारकांकडून वसूल करावयाचे पार्किंगचे दर वाढवून दिले जाणार नाहीत अगर कंत्राटदारास परस्पर वाढविता येणार नाहीत. त्याचप्रमाणे इचलकरंजी महानगरपालिका मिळकत विभागाकडून निश्चित करुन दिलेल्या जागेपेक्षा जादा जागेमध्ये पार्किंग व्यवस्था राबविता येणार नाही.

९) या कामाची मुदत, वर्क ऑर्डरमध्ये नमूद तारखेपासून दोन वर्षांकरिता राहील. तथापि, इचलकरंजी महानगरपालिके कडून सदरचे जागेवर अन्य प्रकल्प विकसीत करावयाचा झालेस किंवा अन्य विकास कामासाठी सदरची जागा इचलकरंजी महानगरपालिकेने पुन्हा ताब्यात घेतलेस, ठेकेदार यांना पूर्वसूचना देऊन सदरची जागा महानगरपालिकेस ताब्यात घेऊन करार संपुष्टात आणणेत येईल. याबाबत मा.आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील. याबाबत ठेकेदारांना कोणत्याही अखत्यारीकडे दाद मागता येणार नाही. अशी परिस्थिती उद्भवलेस ठेकेदाराने इचलकरंजी महानगरपालिका मिळकत विभागाकडे आगाऊ भरलेल्या रक्कमेपैकी इचलकरंजी महानगरपालिकास देय असलेली रक्कम कपात करुन उर्वरित रक्कम ठेकेदारास बिनव्याजी आदा करणेत येईल.

१०) ठेकामध्ये ठेका देणाऱ्याने कोणतीही अट घालून ठेका देणेचे नाही. अथवा अटीचा विचार केला जाणार नाही व अशी अट इचलकरंजी महानगरपालिकेस बंधनकारक रहाणार नाही. अटी सह ठेका सादर केल्यास ते अपात्र ठरवले जाऊ शकते .

Scanned with CamScanner

११) किमान अपेक्षित देकारापेक्षा कमी देकाराचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.

१२) ज्या वैयक्तिक, भागीदारी अगर कंपनीचे नांवे रजिस्ट्रेशन करुन ठेकामध्ये भाग घेतला आहे त्यांचेच नांवाची कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे व त्या नांवानेच टेंडर मंजूर/नामंजूर करणेत येईल.

१३) ज्यांचे नांवे ठेका मंजूर होईल त्यांची बयाणा रक्कम सुरक्षा ठेव म्हणून समायोजित करन घेऊन नामंजूर ठेकादारांची ठेका बयाणा रक्कम मंजूर मक्तेदारास वर्क ऑर्डर दिलेनंतर online परत केली जाईल.

१४)वाहनांचे प्रकारानुसार निश्चित केले दराप्रमाणे निविदा धारकांनी वाहनतळावर वाहन भाडे वसूल करणेचे आहे.

१५) इचलकरंजी महानगरपालिकेच्या वाहनांना तसेच अपवादात्मक परिस्थितीत मनपा कडून कळविणेत आलेल्या वाहनांना पार्किंगची व्यवस्था पूर्णपणे मोफत पुरविणेची आहे.

१६) वर नमूद पार्किंग फि चे दर हे जीएसटी करासह असून, ठेकादाराने सदरचा वसूल केलेला जी.एस.टी. मुदतीत संबंधीत कार्यालयाकडे भरणा करणेचा आहे. तसेच, ग्राहकांना देणेत येणा-या पार्किंग फी चे पावतीवर ठेकादाराचा जी.एस.टी. क्रमांक स्पष्टपणे नमूद करणेचा आहे.

१७)वर नमूद दराने पार्किंग की वाहनधारकांकडून वसूल केलेनंतर संबंधितांना द्यावयाचे पावतीवर पार्किंगची रक्कम आणि जी.एस.टी. रक्कम स्वतंत्रपणे दर्शवून एकत्रित वसुलात आणणेची आहे.

१८) ज्याच्या नावे ठेका मंजूर होईल, त्याने खालीलप्रमाणे रक्कमा भरणा करणे आवश्यक राहील.

| | | |
|---|---|---|
| **प्रथम वर्ष** | एकूण ठेका ठेक्यापैकी प्रथम वर्षाच्या ५० टक्के रक्कमेचा पहिला हप्ता | निविदा स्विकृतीच्या तारखेपासून १५ (पंधरा) दिवसांत इचलकरंजी महानगरपालिका मिळकत विभागाकडे online (RTGS) किंवा डिमांड ड्राफ्ट च्या स्वरूपात भरल्याशिवाय त्यास वर्क ऑर्डर देण्यात येणार नाही |
| | सदरची रक्कम मुदतीत भरलेनंतर उर्वरित ५० टक्के रक्कम | . वर्क ऑर्डर तारखेपासून 1 वर्षाचे आत online (RTGS) किंवा डिमांड ड्राफ्ट च्या स्वरूपात भारणे आवश्यक राहील |
| **द्वितीय वर्ष** | द्वितीय वर्षाच्या पहिल्या सहा महिन्याची रक्कम | द्वितीय वर्षाच्या पहिल्या महिन्यात आगाऊ online (RTGS) किंवा डिमांड ड्राफ्ट च्या स्वरूपात भारणे आवश्यक राहील |
| | द्वितीय वर्षाच्या अंतीम सहा महिन्याची रक्कम | द्वितीय वर्षाचे सहा महिणे समाप्त होताच 15 दिवसात आगाऊ online (RTGS) किंवा डिमांड ड्राफ्ट च्या स्वरूपात भारणे आवश्यक राहील |

इचलकरंजी महानगरपालिका मिळकत विभागाकडे भरणा करणे आवश्यक आहे. मंजूर ठेकादाराने आगाऊ भरणा केलेली प्रिमियमची रकम कोणत्याही सबबीस्तव परत दिली जाणार नाही.

१९) प्रिमियमची रक्कम इचलकरंजी महानगरपालिका मिळकत विभागाकडे मुदतीत भरणा न केलेस थकीत देय रकमेवर द.सा.द.शे. २४ टक्के प्रमाणे दंड आकारणी करणेत येईल.

२०) मंजूर ठेकेदार यांस पे ॲण्ड पार्किंगची जागा निश्चित करुन दिलेनंतर मंजूर पे ॲण्ड पार्किंगच्या जागेवर विविध प्रकारच्या जाहिराती प्रसिध्द करणेचे हक्क इचलकरंजी महानगरपालिका मिळकत विभागाकडे राहतील. त्यापासून प्राप्त होणाऱ्या उत्पनावर कंत्राटदारास हक्क सांगता येणार नाही.

२१) पार्किंगसाठी उपलब्ध करुन दिलेल्या जागेमध्ये ठेकेदारास अन्य कोणताही व्यवसाय करता येणार नाही अगर अशा व्यवसायासाठी जागा उपलब्ध करुन देता येणार नाही.

२२)पार्किंग स्थळासाठी लागणारी विद्युत व्यवस्था उपलब्ध करणेची व त्यांची बिले भागविणेची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. वाहनतळावर ठेकेदाराने स्वतः अगर स्वतःचे खचनि कर्मचारी ठेवून वसूल करणेचा

Scanned with CamScanner

आहे. अशा कर्मचाऱ्यांची नावे व पूर्ण पत्ता फोटोसह इचलकरंजी महानगरपालिका मिळकत विभागाकडे आगाऊ देणेचा आहे. सदर कर्मचाऱ्यांना एकसारखाच गणवेश देणेचा आहे व त्याचे बंच व ओळखपत्र गणवेशावर लावणे बंधनकारक आहे.

२३) ठेकेदार अगर त्यांचे कर्मचाऱ्यांनी पार्किंग स्थळावर सभ्य वर्तन केले पाहिजे. आलेल्या वाहनधारकांशी कोणताही वादविवाद न करता सौजन्याने वागले पाहिजे. एखादे प्रसंगी वादाचा प्रसंग उद्भवून पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद झालेस, त्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील.

२४) पार्किंग स्थळावर वाहनांची मोडतोड, चोरी, नादुरुस्ती व फसवणूक करणे याची सर्वस्वी जबाबदारी वाहन धारकाची राहील. मात्र याची तोषीस मनपास लागू देऊ नये ही जबाबदारी ठेकेदाराची राहील. पार्किंग स्थळाच्या सुरक्षिततेची संपूर्ण जबाबदारी ठेकेदार यांचेवर राहील. पार्किंग स्थळाचे नुकसान झालेस त्याची भरपाई ठेकेदाराकडून करुन घेतली जाईल.

२५) पार्किंग स्थळाचा उपयोग वाहनतळासाठीच केला पाहिजे. त्या ठिकाणी अन्य व्यवहार होत असलेचे निदर्शनास आलेस, करारभंग झालेचे समजून तात्काळ ठेका रद्द करणेत येईल. पार्किंग स्थळावर कोणत्याही प्रकारचे कायम अगर तात्पुरते अतिक्रमण/बांधकाम ठेकेदाराने करु देणेचे नाही च स्वतःही करणेचे नाही,

२६) कोणत्याही कारणास्तव ठेक्याच्या मुदतीत केव्हांही ठेका रद्द करणेचा व ठेकेदारास वाहन फी वसुली न करणेस सांगणेचा हक्क मा. आयुक्त यांना आहे. यासाठी ठेकेदार यांना एक महिन्याची आगाऊ सूचना देणेत येईल, याबाबत ठेकेदारास तक्रार करता येणार नाही अगर नुकसान भरपाई मागता येणार नाही.

२७) सरकारी हुकूम, नैसर्गिक आपत्ती व अन्य अपरिहार्य कारणाने वाहनतळ बंद राहिल्यास त्याबाबत ठेकेदारास कोणतीही तक्रार करता येणार नाही अगर त्याबाबत त्यास ठेक्याच्या रक्कमेतून सूट मिळणार नाही व उर्वरित रक्कमही मागता येणार नाही

२८) इचलकरंजी महानगरपालिकेने निश्चित केलेल्या दराचे पत्र्याचे फलक वाहनतळावर ठळकपणे प्रदर्शित होतील, अशा इकडील निर्देशित केले ठिकाणी लावणेचे असून, सदर फलकांवर ठेकदाराचे संपूर्ण नांव, पत्ता, फोन नंबर व ठेक्याचा कालावधी नमूद करणेचा आहे. तसेच, खाली नमूद केलेली सूचना व पार्किंग दर फलकावर ठळकपणे प्रसिध्द करणेचे आहेत.

२९) वरीलप्रमाणे बसविणेत आलेले बोर्ड इकडून निर्देशित करणेत आलेल्या ठिकाणी बसविणेचे असून, सदरचे बोर्डस् खराब झालेस अगर निघालेस ते त्याच दिवशी तांतडीने बसविणेचे आहेत. इचलकरंजी महानगरपालिका मिळकत विभागाकडील अधिकाऱ्यांचे तपासणीवेळी वरीलप्रमाणे बोर्डस् प्रदर्शित झाले नसलेचे निदर्शनास आलेस असे बोर्डस इचलकरंजी महानगरपालिका मिळकत विभागाकडून बसविणेत येतील व त्यासाठी येणारा खर्च कंत्राटदाराने आदा करणे बंधनकारक राहील अगर तो खर्च इचलकरंजी महानगरपालिका कंत्राटदाराकडून वसूल करेल,

३०) ठेकेदाराने स्वखर्चाने इलेक्ट्रॉनिक तिकीटींग डिव्हाईसद्वारे वाहनधारकांना पार्किंगची तिकीटे देणेची असून, यामध्ये कोणत्याही परिस्थितीत छापील तिकीटांचा वापर करणेचा नाही. सदरचे मशिनमधून विक्री केलेल्या तिकीटांचा डाटा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयीन इश्यु-कॅश विभाग व मनपाकडील सर्व्हरमध्ये डाऊनलोड करुन लिंक करणेचा आहे. सदरचा डाटा एक वर्ष कालावधीमध्ये नियमितपणे उपलब्ध करुन देणेचा आहे.

३१) ठेकेदार यांनी पार्किंग स्थळावरील नियमांचे कोणत्याही परिस्थितीत उल्लंघन करणेचे नाही. तसेच, कोणत्याही वेळी वाहनतळाची तपासणी करणेचा अधिकार इचलकरंजी महानगरपालिके अधिकाऱ्यांना राहील.

३२) ठेकेदाराने पार्किंग स्थळावरील मोक्याच्या ठिकाणी वेळ दर्शविण्यासाठी मोठे घड्याळ लावणे बंधनकारक आहे.

३३) वाहनतळ तिकीटांवर वाहनांचा क्रमांक व वेळ लिहिणे बंधनकारक आहे.

Scanned with CamScanner

३४) पे अॅण्ड पार्क' ठिकाणी जागेचे सपाटीकरण करणे व वाहन पार्किंगसाठी पांढऱ्या व पिवळ्या रंगाचे पट्टे मारणे इ. कामे मंजूर ठेकाधारकाने करणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे वाहन पार्किंग जागेवर वाहनधारकांच्या सोईसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणेची आहे. तसेच, फिरते शौचालय उभे करणेचे असून, ते नियमितपणे स्वच्छ ठेवणेची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. सदर सुविधा कंत्राटदाराने मोफत उपलब्ध करावी .

३५)इचलकरंजी महानगरपालिका व्यवस्थापनाकडून ठेका मुदतीत वेळोवेळी केलेल्या सूचनांचे तात्काळ पालन ठेकदाराने करणेचे असून, अशा केलेल्या सूचनांचे पालन न केलेस ठेकेदार यांना आगाऊ नोटीस देऊन ठेका रद्द करणेत येईल.

३६)ठेकेदार यांनी पार्किंग जागेच्या ठेक्याच्या कालावधीचे करारपत्र स्वखर्चाने करुन देणेचे आहे. त्यासाठी प्रॉपर्टीधारक (लायक) जामिनदार देणेचे आहेत.

३७)मंजूर ठेकेदार याने शर्तीचा भंग केलेस अगर अन्य कारणाने कॉन्ट्रक्ट रद्दबातल झालेम, उर्वरित मुदतीसाठी फेर ठेका मागविले जाईल किंवा इतर कोणत्याही रितीने दुसरीकडून कामगिरी करवून घेतली जाईल. त्यामध्ये इचलकरंजी महानगरपालिकेस फायदा झालेस मूळ ठेकेदार तो मिळणेस पात्र रहाणार नाही. मात्र, त्यात नुकसान झालेस मूळ ठेकेदार यांचेकडून नुकसानीची वसुली केली जाईल. तसेच, सुरक्षा ठेवीची रक्कम खास जमा करुन घेऊन, इचलकरंजी महानगरपालिका मिळकत विभागाचे भविष्यातील कंत्राट ठेका घेणेस अपात्र (ब्लॅकलिस्ट) ठरविले जाईल.

३८)करार मुदतीमध्ये सदर कामगिरीसंबंधी कोणताही वाद निर्माण झालेन त्यासंबंधी मा. आयुक्त, इचलकरंजी महानगरपालिका यांचा निर्णय अंतिम राहील.

३९) सदर कामगिरीच्या कराराची मुदत ठेका ताब्यात दिलेनंतर एक वर्ष कालावधी पर्यंत राहील. सदर मुदतीनंतर ठेक्याची मुदत वाढविणे अगर करार नुतनीकृत करण्याचे अधिकार मा.आयुक्त इचलकरंजी महानगरपालिका यांना राहतील व त्यास मा. इचलकरंजी महानगरपालिका समितीची अंतिम मंजुरी घेणेत येईल.

४०)कोणतेही किंवा सर्व टेंडर्स कारण न देता नाकारणेचा अधिकार मा. आयुक्त यांना राहील.

४१)मंजूर ठेकेदार व इचलकरंजी महानगरपालिका उपक्रम यांचे दरम्यान कोणत्याही कारणास्तव वाद निर्माण झाल्यास त्याचे न्यायाधिकरण इचलकरंजी राहील.

४२) सदर जाहीर प्रकटन http://ichalkaranjimnp.inया इचलकरंजी महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर दि. 23/02/2024 रोजी स. 11.00 वाजलेपासून दि. 29/2/2024 रोजी दु. 2.00 वाजेपर्यंत ऑनलाइन पहावयास मिळेल.

४३) इचलकरंजी महानगपालिका बारनिशी विभाग, इ.म.पा. कार्यालयात सीलबंद कोटेशन दर सदर करण्याची अंतिम दि. 29 /02 /2024 साय.5.00 वाजेपर्यंत राहील.

४४) शक्य झाल्यास प्राप्त कोटेशन / बंद लिफाफा दि.01/03 /2024 रोजी दु.3.00 वाजता उपस्थित ठेकेदार याचे समोर उघडणेत येईल.

४५) कोणतेही कोटेशन दर मंजूर अथवा नामंजूर करणेच अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवलेले आहेत. त्याची कोणतीही कारणे दिली जाणार नाहीत.

23.2.24

उपायुक्त
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with CamScanner